# महिलांचे उद्यमित्व; संधी आणि आव्हाने

**डॉ. सुनीता निथुरी रविदास**
कला आणि वाणिज्य पदवी महाविद्यालय,
जवाहर नगर, भंडारा 441906
मो. नं. 9511847513
Email ID: sunitaravidas8@gmail.com

---

आजच्या आधुनिक युगात महिलांनी विविध क्षेत्रात आपले महत्व सिध्द केले आहे. शिक्षण, विज्ञान, कला, क्रिडा, यासारख्या क्षेत्राप्रमाणेच महिलांनी उद्यमितेच्या क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवायला सुरुवात केली आहे. उद्यमिता म्हणजे केवळ व्यवसाय सुरु करणे नव्हे तर त्यामध्ये मानविय धाडस आणि नेतृत्व याचा समावेश असतो.

मात्र महिला उद्यमो जिकांसमोर काही विशिष्ट संधी उपलब्ध असल्या तरी त्याच वेळी अनेक सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानानाही सामोरे जावे लागते. आज विविध सरकारी योजना तत्रज्ञानाची मदत आणि समाजातील सकारात्मक बदल याच्या जोरावर महिलांना उद्यमिता क्षेत्रात प्रगतीची नवी दारे खुली होत आहेत. या पार्श्वभुमीवर महिलांना उपलब्ध असलेल्या संधी आणि त्यांच्या समोरील आव्हानांचा सखोल आढावा घेणे आवश्यक आहे.

महिला उद्यमिता म्हणजे महिलांनी स्वत:च्या मालकीचे व्यवसाय सुरू करणे आणि चालवणे महिला उद्योजकांसाठी संधी आणि आव्हाने दोन्ही आहेत संधी मध्ये महिला उद्योजक नविन कल्पना आणि समाजाला फायदा होतो. तसेच महिलांना त्याचे जीवनमान उचांवण्याची संधी मिळते तथापि महिला उद्योजकांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते जसे की आर्थिक संसाधनाची कमतरता सामाजिक आणि सांस्कृतिक रुढीवादी विचार आणि कामाच्या ठिकाणी भेदभाव भारतातील महिलांची आर्थिक स्थिती आणि आव्हाने यांचा अभ्यास करताना भारत हा विकासनशील व कृषिप्रधान देश आहे या दोन गोष्टी नमूद करणे महत्वाचे आहे.

आर्थिक स्थिती ही आर्थिक विकासाशिवाय मोजता येणार नाही म्हणून आर्थिक विकासाचा अर्थ पाहणे महत्वाचे आहे. ऐका देशाच्या समाजात होणाऱ्या अशा बदलाशी आहे. तिथे अल्प विकसित स्तरातून उच्च स्तराला गाठण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रकियेला आर्थिक विकास म्हणतात. महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी महिलांचा कौटुंबिक सामाजिक आर्थिक, राजकीय स्थितीचे अध्ययन करून त्यांच्या समोर येणाऱ्या विविध समस्या आव्हाने यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. आधुनिक काळात महिलांचे कुटुंब हे क्षेत्र नसून इतर सर्व क्षेत्रात त्यांनी आपली कामगिरी द आहे. देशाच्या विकासाला हातभार लावला आहे. असे एक पण क्षेत्र नाही त्या ठिकाणी महिला काम करत नसतील महिलांनी शिक्षण कौशल्य, बुध्दिमत्ता व नाविन्यपूर्ण कल्पनांच्या जोरावर सर्व क्षेत्रात आपली कामगिरी बजावली आहे. या सर्व गोष्टिचा अभ्यास करण्याचा प्रयत्न शोध केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) भारतातील महिलांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

Research Hub International Journal

२) भारताच्या आर्थिक विकासात महिलांचा सहभाग किती आहे जाणून घेणे.

३) भारताच्या विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याऱ्या महिलांचा मागोवा घेणे.

४) भारतातील महिला समोर येणाऱ्या आव्हानांचा शेध घेणे व त्यावर उपाययोजना शोधन काढणे.

**गृहितके :**

१) आधुनिक काळात भारतीय महिलांच्या आर्थिक स्थितीत बदल झालेला आहे.

२) भारताच्या विविध क्षेत्रामध्ये महिलांची कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे.

३) महिला बचत गटाच्या माध्यमातून भारतीय महिलांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

४) भारतीय लघुउद्योग क्षेत्रामध्ये महिलांनी भरीव अशी कामगिरी करून आपली आर्थिक स्थिती सुधारली आहे.

**महिलांची आर्थिक स्थिती :**

भारतातील महिलांची आर्थिक स्थिती ही शिक्षणामुळे बदलेली आहे. २१ व्या शतकातील महिला ही स्वंय स्वावलंबी आणि स्वांतत्र्य जीवन जगण्याइतपत सक्षम झाली आहे. देशाच्या विकास हा मानवी ससांधनावर अवलंबून असतो. यामध्ये महिला आणि पुरुष या दोघांचे ही स्थान महत्वाचे आहे. आज महिला खेळाचे क्षेत्र विज्ञान, तत्रज्ञान राजकारण कॉपोरेट जग, अभिनय किवा लष्करी क्षेत्र, वैद्यकिय क्षेत्र किंवा अभियांत्रिक बँकीग क्षेत्र इत्यादी क्षेत्रात आपले महत्वाचे योगदान देत आहेत. त्यातून त्यांचा भारताचा आर्थिक विकासात वाटा हा महत्वाचा आहे. त्यामुळे या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांच्या कामाचा थोडक्यात परिचय खालील प्रमाणे आपणास देता येतो.

**शेतमजूर महिला श्रमिका :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. ग्रामीण भागात रोजगाराचे एकमेव साधन म्हणजे कृषी क्षेत्र आहे. ग्रामीण महिला या शेतमजूरी करून कुटुबांचा उदर निर्वाहाच्या मजुरीमध्ये अशिक्षित वर्गाचे प्रमाण खूप जास्त आहे त्यामुळे शेतमजूर वर्गाल त्यांच्या श्रमाच्या मोबदला योग्य प्रमाणात मिळतो असे नाही तरी देखील कौटुबिंक जवाबदारी पुर्ण करून शेतमजूर महिला शेतीच्या मशागतीची कामे करतात. विशेषता महिलांची कृषी क्षेत्रामध्ये महत्वाची भुमिका असून अन्न व कृषी मंडळाच्या आकडेवारीनुसार महिलाचे शेतीमध्ये ३२% तर कृषीविषयक रोजगारामध्ये ४८% योगदान आहे. जागतिक बँकेच्या उपलब्ध आकडेवरीनुसार भारताच्या सकल घरेलू उत्पदनात केवळ १७.५ शेती उत्पादनाचा वाटा आहे. ग्रामीण भागामध्ये शेतीवर अवलंबून असलेल्या महिलांची टक्केवारी साधरणात ८४% इतकी आहे. यात सुमारे ३३ कोटी शेतकरी आणि ४८% शेतमजूरी करतात. भारतात महिला शेतमजुरांना श्रमाचा योग्य मोबदला दिला जात नाही. वाढीव कामाच्या तासाचा मोबदला दिला जात नाही शारीरीक कमकुवत पणाचे कारण दाखवून त्यांच्या मजुरीत सुध्दा कपात केली जाते. या पासून शेतमजूर महिलांची सुटका व्हावी यासाठी कोणत्याही योजनेची शासनामार्फत अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. त्याच्या आर्थिक स्थितीवर खूप मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे हे दिसून येते.

Research Hub International Journal

**महिला बचत गट :**

देशातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून भरीव अशी कामगिरी केली आहे. महिलांनी आपली बचत ही गुंतवणूक करून कौशल्यपूर्ण योग्य निर्णय श्रमतेचा वापर करून बचत गटातील सर्व महिलांच्या निर्णयाला प्राधान्य देऊन बचत गटाचे कामकाज महिला करत आहेत. महिलांनी महिलाचा आर्थिक विकास करण्याकरीता चालला गट म्हणजे आपली बचत गोळा करतात बँकेत जमा करतात आणि बॅकेकडून कर्ज घेतात आणि त्या रकमेतून कोणत्याही वस्तूची खरेदी करून त्यांच्यामध्ये कौशल्याचा वापर करून नाविन्यपूर्ण वस्तू तयार करतात व त्या वस्तूची पॅकिंग करून विक्री करून नफा प्राप्त करतात मिळालेल्या उत्पादनातून कर्जाची परतफेड करतात व ती रक्कम समान भागात बचत गटातील महिलांमध्ये वाटणी करतात त्यांना मिळालेला भाग म्हणजे त्यांचे उत्पन्न होय. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक बाजू चांगलीच मजबूत झाली आहे. ग्रामीण भागातील महिलामध्ये बचत गटाचे प्रमाण ही खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बचत गाटज्ञत सर्व व्यवहार हे बँकांशी निगडीत असल्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाशी जोडले जाते बचत गटातील महिला पशुपालन शेती घरगुती पापड उद्योग लोणचे उद्योग गोधडी उद्योग अशा विविध वस्तूचे उत्पादन करून ते बाजारपेठेपर्यंत विक्री करतात आणि त्यांच्या माध्यमातून त्यानां मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होते. महिला संघटित होऊन हे कार्य करत असतात त्यामुळे त्यांच्या आर्थिक परस्थितीमध्ये सुधारणा होण्यास हातभार लागला आहे.

**लघुउद्योग क्षेत्रातील महिला कामगार उद्योजक :**

देशातील औद्योगिक विकासात लघुउद्योग क्षेत्रात वाटा महत्वचा आहे कमी भांडवल गुंतवणूक आणि मर्यादित श्रमिक वर्ग यांच्या साह्याने लघु उद्योगाची स्थापना केली जाते नियोजनबध्द आर्थिक विकासासाठी मोठ्या उद्योगाबरोबरच लघुउद्योग क्षेत्राची देखील वाढ घडवून आणली आहे. देशाच्या औद्योगिक विकास कार्यक्रमात लघु आणि मध्यम उद्योगाचे स्थान महत्वपुर्ण आहे. म्हणूनच उद्योग क्षेत्राला साह्यय साकरण्यासाठी उद्योगाचे संवर्धन करण्यासाठी व शासनमार्फत वित्त योजना राबविल्या जातात. संतुलित आर्थिक विकास व ग्रामिण भागाच्या विकासात लघु उद्योगाचे भुमिका विशेष महत्वाचे आहे. कृषी उत्पादन मालावर प्रक्रिया करून कृषी पुरक व्यवसायाची निर्मिती करण्यासाठी लघुउद्योग क्षेत्र खूप मोलाची कामगिरी करते राजकीय दृष्टीने जर विचार केला तरी आर्थिक शक्तीशाली केद्रींकरणास लघुद्योग उपयुक्त ठरतात मोठ्या उद्योगात आर्थिक शक्ती मुठभर व्यक्तीच्या हातात केद्रींत झालेली असते. अशा प्रकारे देशाची आर्थिक विकासांचे संतुलन राज्यासाठी लघुउद्योग क्षेत्र मोठ्या प्रमाणात महत्व ठरते.

**विज्ञान क्षेत्रात महिलांचे योगदान :**

सध्याच्या युगात विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती खूपच आश्चर्यजनक व वेगाने वाढताना दिसुन येते. भारताच्या आर्थिक विकासात वैज्ञानिक क्षेत्राचा वाटा मोठा आहे. भारतात गेल्या दोन दशकामध्ये विज्ञानाच्या विविध शाखा मध्ये महिलांनी योगदान दिले आहे. त्यामध्ये भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणून डॉ. आनदीबाई जोशी यांचे नाव घेतले जाते. जानकी अमल यांनी भारतात बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया मध्ये नोकरी सुरवात केली त्यात त्या डायरेक्टर जनरल झाल्या. कमला साहोनी या विज्ञान शाखेतील पी. एचडी मिळणाऱ्या पहिल्या भारतीय महिला आहेत. तर अण्णा मनी यांचे नाव हवामान शास्त्रांच्या संशोधनामध्ये प्रामुख्याने घेतले

Research Hub International Journal

जाते. भारतीय हवामान शास्त्रज्ञ राजेश्वरी चटर्जी या कर्नाटक मधील पहिल्या महिला अभियंता होत्या. दर्शना रंगनाथन दर्शन ऑरगॅनिक केमिस्ट्र म्हणून नावाजलेल्या वैज्ञानिक होत्या व महाराणी चक्रवर्ती यांची मॉलिक्युलर बायोलॉजिस्ट म्हणून आहे.

चारूशिला चक्रवर्ती दिली येथे केमिस्ट्रिच्या प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत, तर मंगला नारळीकर गणित तज्ञे म्हणून यांचे देखील आधुनिक काळातील महिलांची आर्थिक स्थिती पाहिजे तितकी सुधारलेली नाही. मगंलयान चंद्रयान यासारख्या इतर सर्व या निर्मिती क्षेत्रामध्ये व इस्त्रो या वैज्ञानिक संस्थेत काम करणाऱ्या सर्व महिला या कुटुंब नोकरी दोन्ही जबाबदाऱ्या चोकवणे बजावत आहेत. इतर सर्व महिलाचे योगदान आणि त्यांच्या आर्थिक जबाबदारीकडे दुर्लक्ष केली तरी भारतीय विकासात त्यांच्या आर्थिक मोजमाप योग्यरित्या होत नाही. वरील सर्व महिला उद्योजकांची माहिती देण्यासाठी एकच उद्देश्य आहे. तो म्हणजे भारताच्या आर्थिक विकासात महिलांचा मोठा सहभाग आहे. तरी सुध्दा भारतामधील महिला पुढे विविध आव्हाने येतात त्याचा सुध्दा अभ्यास या प्रस्तृत शोधनिबंधात केला आहे.

**संकल्पना महिला उद्यमित्व संधी आणि आव्हाने :**

महिला उद्यमित्व म्हणजे महिलानी स्वखर्चाने किवा कर्जाच्या साहाय्याने स्वत:च्या उद्योग, व्यवसाय सेवा किवा उत्पादन चालवण्याची प्रक्रिया यामध्ये महिला आपले नेतृत्व व्यवस्थापन कौशल्य, जोखिम घेण्याची तयारी आणि नाविण्यपूर्ण कल्पनांच्या आधारे उद्योजकतेचा मार्ग स्विकरतात.

पुर्वी महिलांना मुख्यत: घरगुती जबाबदाऱ्या आणि कौटुबिंक भुमिकापुरती मर्यादा होती मात्र आज महिला विविध व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रामध्ये सक्रिय भुमिका बजावत आहेत. त्यांनी बुटीक सौंदर्यपार्लर, अन्न प्रक्रिया शेतीपुरक व्यवसाय ऑनलाईन विक्री डिजिटल सेपासून ते मोठ्या उद्योगापर्यंत यश मिळवले आहे.

महिलांच्या उद्योमित्वाला चालना देण्यासाठी आज विविध सरकारी योजना स्वयं साह्यता गट (Self Help Groups) आणि डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांसाठी नविन आर्थिक संधी उपलब्ध होत आहेत. तरीही महिला उद्यमिता अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यात आर्थिक भांडवलाचा अभाव, समाजातील लिंग भेद, तांत्रिक ज्ञानाचा अभाव कौटुबिंक बंधने आणि बाजारपेठेतील स्पर्धा ही प्रमुख अडचणी आहेत. या संकल्पनेतून हे स्पष्ट होते की महिला उद्यमित्व ही आर्थिक स्वावलंबनाची दिशा असून तिच्या यशस्वी वाटचालीसाठी समाज शासन आणि उद्योजगत यांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे.

**महिला उद्यमित्व संधी :**

आजच्या सामाजिक आर्थिक आणि तांत्रिक विकासाच्या युगात महिलांसाठी उद्यमित्वाच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. शासनाच्या विविध योजना डिजिटल माध्यमांचा प्रसार, शिक्षणात वाढलेली उपस्थिती आणि समाजाचा बदलेला दृष्टीकोन यामुळे महिलासमोर स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचे दारे उघडली आहेत.

**महिला उद्योजक्ता संधी :**

१) **सरकारी योजना आणि प्रोत्साहन :** महिला उद्योजकांसाठी अनेक योजना उपलब्ध आहेत. जसे की

मुद्रा योजना, स्टार्ट अप इंडिया, महिला उद्यामिता मंच (WEP) इ. कर सवलती प्रशिक्षण आणि कर्ज सुलभतेने मिळते.

२) **शैक्षणिक आणि कौशल्य प्रशिक्षण :** अनेक NGO सरकार आणि खासगी संस्था महिलांसाठी वव्यसाय प्रशिक्षण व कौशल्यवृध्दी कार्यक्रम चालवतात.

३) **डिजिटजल युगाचे फायदे :** सोशल मिडीया ई-कॉमर्स डिजिटल पेमेट्स यामुळे महिला घरातूनही व्यवसाय सुरू करू शकतात.

४) **स्वंतत्रता आणि आत्मविश्वास :** उद्यमिता महिलांना आर्थिक स्वालंबन आणि सामाजिक प्रमिष्ठा देते.

५) **नेटवर्कींग आणि स्टार्टअप इकोसिस्टम :** महिला उद्योजिकांसाठी विशेष नेटवर्कींग प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत जसे की,

६) **आर्थिक विकास :** महिला उद्योजकता नविन व्यवसाय आणि नोकऱ्या निर्माण करून देशाच्या अर्थ व्यवस्थेला चालना देते.

७) **नविन कल्पना आणि दृष्टीकोन :** महिला उद्योजकता महिलांना आर्थिक दृष्टया सक्षम बनवते. ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते आणि सामाजिक समानता वाढते.

८) **सशक्तीकरण :** महिला उद्योजकता महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम बनावते आणि सामाजिक समानता वाढते.

९) **समाजाला फायदा :** महिला उद्योजक समाजाला नविन उत्पादने, सेवा आणि उपाययोजना पुरवतात त्यामुळे जिवनमान सुधारते.

**डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर :**

महिलांसाठी घरबसल्या व्यवसाय सुरु करण्याची संधी ऑनलाईन बुटीक होम, नोकरी, सोशलमिडीया, मार्केटिंग, मेकअप आर्टिस्ट, युट्यूब चॅनल्स, ब्लॉगिंग इत्यादि. Amazon, Meeso, Flipcart, Easy, सारख्या प्लॅटफॉर्मवर घरगुती उत्पादनाची व्रिकीत वाढ होते.

**ग्रामिण भागातील उद्योगांची संधी :**

१) कृषीपूरक व्यवसाय : अन्न प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, सेंद्रीय शेती, मशरूम उत्पादन.

२) हस्तकला व गृहउद्योग : राखी, दिवे, अगरबत्ती, पापड, लोणच, साडी पिका फॉल. इ.

**महिला उद्यमित्वातील आव्हाने :**

महिलांनी उद्योग क्षेत्रात पदार्पण करून स्वत:चा व्यवसाय उभारण्यास सुरुवात केली आहे. पण अजूनही त्यांना अनेक अडथळयांना तोंड द्यावे लागते. महिला उद्यमीत्वाच्या वाटचालीतील या अडचणी सामाजिक आर्थिक कौटुबिंक व वैयक्तिक अशा विविध स्वरुपाच्या असतात.

**आर्थिक मर्यादा :**

१) भांडवल उभारण्यात अडचणी येतात

२) बँका व वित्तसंस्थांकडून कर्ज मिळवताना अटी कठीण असतात.

३) कर्ज मिळाले तरी त्याची परतफेड हि महिला उद्योजकांसाठी आव्हानात्मक ठरते.

**कौटुंबिक बंधने :**

१) महिलावर घरगुती जबाबदाऱ्या अधिक असतात.

२) अनेक वेळा पती किंवा कुटुंबियांचा पाठिबां मिळत नाही.

३) व्यवसाय व कुटुंब यांच्यात समतोल राखणे कठीण जाते

**सामाजिक मानसिकता व लिंगभेद :**

१) महिलानी व्यवसाय कनू नये, किवा त्या फक्त घर चालवतात असा जुना दृष्टीकोन अजूनही काही ठिकाणी दिसतो.

२) महिला उद्योजकांकडे विश्वासाने पाहिले जात नाही.

३) ग्राहक वितरक व कत्रांटदार यांच्याकडून स्त्री उद्योजिकाशी तटस्थ वागणूक दिली जाते.

**शिक्षण व तांत्रिक कौशल्याच्या अभाव :**

१) अनेक महिलांना व्यवसाय सुरू करताना आवश्यक तांत्रिक आर्थिक व व्यवस्थापन कौशल्ये माहित नसतात.

२) डिजिटल व्यवहार मार्केटिंग ब्रँडिग यांची माहिती कमी असते.

**व्यवसाय चालवण्याचा अनुभवाचा अभाव :**

१) सुरुवातीला मार्गदर्शन न मिळाल्यास व्यवसाय टिकवणे कठिन जाते.

२) यामुळे अनेक महिला व्यवसाय थोडक्यात किवा नुकसान सोसतात.

**बाजारपेठेतील स्पर्धा :**

१) मोठ्या ब्रँड्स किंवा पुरुष उद्योजकांशी स्पर्धा करतांना अडचणी येतात.

२) उत्पादन विक्रीसाठी योग्य प्लॅटफार्मची माहिती नसते.

**निष्कर्ष :**

आधुनिक काळातील भारतीय महिलाच्या आर्थिक सामाजिक राजकीय व कौटुबिंक स्थितीचे वर्णन प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे. महिलाच्या सर्वागिण विकासासाठी त्यांना शिक्षण मिळांले पाहिजे, रोजगार मिळाला पाहिजे व सुरक्षितता मिळाली पाहिजे, आजच्या काळात विज्ञान तत्रज्ञांन लघुउद्योग क्षेत्र अंतराळ क्षेत्र सरंक्षण क्षेत्र वैज्ञानिक शैक्षणिक औद्योगिक इत्यादि. क्षेत्रामध्ये महिलांनी जरी आपला ठसा उमटवला असला तरी आजही म्हणावा तितका म्हणजेच ५० टक्के भारताच्या आर्थिक विकासात वाटा नाही हे, आपणास दिसून येथे त्यासाठी आखून महिला सक्ष्मीकरण करणे आवश्यक आहे. हे आपणास संशोधनाअंती दिसून येते.

**संदर्भ यादि :**


- महिला व बालविकास मत्रांलय भारत सरकार, वेबसाईट https://wcd.nic.in
- महिला उद्यमशिलता विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना व उपक्रमाची माहिती.
- MSME Ministry सुक्ष्म, लघु, व मध्यम उद्योग मंत्रालय वेबसाईट https://msme.gov.in
- SIDBI (Small Industries Development Bank of India) महिला उद्योमिता वाढविण्यासाठी खास योजनांचा आराखडा
- महिला उद्योजक्ता एक अभ्यास (शोध निबंध / जनरल लेख) लेखक डॉ. मंजुषा देशमुख प्रकाशक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ संशोधन पत्रिका, पुणे
- भारतातील ग्रामीण भागातील महिला उद्योजक्ता एक विश्लेषण सामाजिक विज्ञान व वाणिज्य क्षेत्रातील अभ्यास क्रमांमध्ये वापरले जाणारे संदर्भ नॅशनल स्किल डेव्हलपमेट कॉर्पोरेशन (NSDC) वेबसाईट https://nsdcindia.org महिलांसाठी कौशल्य विकास व उद्यमता प्रशिक्षण


Research Hub International Journal